# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०१ १०१ दुरध्वनी क्र.२८१८११८२, २८१९२८२८.

जा.क्र.मनपा/कर/ 338 /१८-१९

दि. 8 / 12 /२०१८

प्रति,

श्री. राजकुमार घरत
सिस्टीम मॅनेजर तथा
प्र. जनसपंर्क अधिकारी

संगणक विभाग
आवक क्र: 9248
दिनांक : 05/12/2018

विषय :- भाडेपट्टीने दिलेल्या मालमत्तांचे कर निर्धारण करणे बाबतची सुचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देणे बाबत.

संदर्भ :- १) मा. महासभा ठराव क्र. ६२ दि. २०/०२/२०१८
२) मा. आयुक्त सो. यांचे दि. ०३/१२/१८ ची मंजूरी.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येत आहे की, महानगरपालिका हद्दीतील ज्या मालमत्ता भाडे करारनामा करुन व्यवसाय करणेकरीता दिलेले आहेत अशा मालमत्तांच्या कर आकारणी बाबत मा. महासभेने दि. २०/२/२०१८ रोजी ठराव क्र. ६२ अन्वये निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने सदरची जाहिर सुचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे तसेच याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या सुची व अर्जाचा नमुना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे बाबत. मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

तरी सोबत जोडण्यांत आलेली जाहिर सुचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन त्याचे कात्रण या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यांत यावे. तसेच विहित अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रांची सुची महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरीता नमुना या पत्रासोबत जोडुन देण्यांत येत आहे.

कर निर्धारक व संकलक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मालमत्ता कर विभाग

## भाडे करारनामाव्दारे व्यवसाय करणारे मालमत्तांना करावयाच्या कर आकारणी बाबत आवश्यक कागदपत्रांची सुची

१) अर्ज

२) नोंदणीकृत करारनामाची छायांकित प्रत.

३) चटई क्षेत्रफळाबाबत वास्तु विशारद यांचा दाखला.

४) मालमत्ता कराचे देयक

५) मालमत्ता कराचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा संपूर्ण कराचा भरणा पावतीची छायांकित प्रत.

अर्जदार :-

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

दि.

प्रति,
मा. कर निर्धारक व संकलक साहेब
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- भाडेकरारनामा नुसार मालमत्ता कराची आकारणी करुन मिळणे बाबत.

महोदय,

वरिल विषयाच्या अनुषंगाने आपणांस विनंतीपूर्वक अर्ज करण्यांत येत आहे की, महानगरपालिका हद्दीतील ------------------------------------------------------------ या पत्यावरील जागा आम्ही ---------------------------------------- यांचेकडुन भाडे करारनामा करुन व्यवसाय करणेकरीता जागा भाडे स्वरुपात घेतलेली असून त्याचे वार्षिक भाडे रक्कम रु. ------------------- एवढे आहे.

तरी महोदयांना आमची नम्र विनंती आहे की, कृपया आपण आमच्या भाडे करारनामानुसार वार्षिक देय रक्कमेवर मालमत्ता कराची आकारणी करुन द्यावी.

आपला नम्र

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम)

ता.जि.ठाणे-४०११०१, दूरध्वनी :२८१९२८२८.


## भाडेपट्टीने दिलेल्या मालमत्तांचे कर निर्धारण करणे

## // जाहिर सुचना //

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कलम ७ अन्वये)**

**(मा. महासभा ठराव क्रं. ६२ दि. २०/०२/२०१८)**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांस / भोगवटा धारकांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कलम ७ अन्वये व मा. महासभा ठराव क्रं. ६२ दि. २०/०२/२०१८ अन्वये **बिगर निवासी मालमत्ता (मोबाईल टॉवर व्यतीरीक्त) भाड्याने दिल्यास प्रत्यक्ष वार्षिक भाड्याच्या २०% इतके करयोग्य मुल्यासाठी वार्षिक भाडे गृहीत धरुन किंवा भाडेपट्टीने दिलेल्या बिगर निवासी मालमत्तांसाठी रु. १०/- प्रति चौ.फू. हा दर मासिक भाडे करीता गृहीत धरुन (जे जास्तीचे असेल त्यानुसार).** अश्या मालमत्तांना कर आकारणी करणे करीता नागरिक / मालमत्ताधारक / जमिन मालक यांना कर आकारणी करणे कामी अर्ज सादर करणेसाठी आवाहन करण्यात येत आहे.

भाडेपट्टीने दिलेल्या मालमत्तांचे मा. महासभा ठरावाप्रमाणे कर निर्धारण करणे करीताचा विहीत नमुन्यातील अर्ज / आवश्यक कागदपत्रांची सुची महापालिका वेब साईट वर **www.mbmc.gov.in** उपलब्ध आहे.

सबब जे मालमत्ताधारक दि. १५/१२/२०१८ ते दि. १५/०२/२०१८ पर्यंत स्वत:हुन महापालिकेत भाडेतत्वावर आकारणी करणेकामी अर्ज करतील त्यांना शास्ती/दंड लावणेंत येणार नाही. तथापी जे मालमत्ताधारक दिलेल्या मुदतीत महापालिकेत भाडेतत्वावर कर आकारणी करणे कामी विहिती नमुन्यातील अर्ज करणार नाहीत त्यांना शास्ती/दंड भरणे बंधनकारक असणार आहे.

करीता या जाहिर आवाहनाव्दारे मालमत्ताधारकांना सुचित करणेंत येते की, आपली मालमत्ता भाडेतत्वावर दिली असल्यास मुदतीत महापालिकेत अर्ज करुन याचा लाभ घ्यावा.

सही/-

(विजयकुमार म्हसाळ)

उपाआयुक्त (कर)

मिरा भाईंदर महानगरपालिका

दि. / /२०१८

जा.क्रं.मिभामनपा/कर/